**महाराष्ट्र राज्य, माहिती आयोग खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ८२५/२०२१**

**अपिलार्थी, श्रीमती विभा बावनकर,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी,**
तहसिल कार्यालय, रामटेक ता. रामटेक जि. नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
तहसिल कार्यालय, रामटेक ता. रामटेक जि. नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०१.२०२३**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५.११.२०२० | ०५.०१.२०२१ | १२.०१.२०२१ | ०८.०२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५.११.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी “ विभा प्रकाश बावनकर राहणार D४०३ VEDIKA HABITAT, RANDESAN, Pin ३८२००७ State :- Gujarat यांनी आपल्या शिधापत्रिकेची छायांकीत प्रत देण्याबाबत.” माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळण्याबाबतचे मा. उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र.२ विपाविम तथा भारामप्रा. नागपूर यांच्या कार्यालयाकडून पत्र पुरवठा शाखेत प्राप्त झालेला असुन अर्जदार यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अर्जाचे अवलोकन केले असता संदर्भिय अर्जात नमुद माहितीच्या संबंधाने ही माहिती त्रयस्थ व्यक्तीची श्री. सुरेशराव पाटील यांची असल्यामुळे त्यांच्या परवानगीने माहिती उपलब्ध होताच आपणास तात्काळ पुरविण्यात येईल. असे अपिलार्थीस कळविले.

त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक १२.०१.२०२१ रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "विहीत मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०८.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून आदेशात जनमाहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी पुरवठा, रामटेक, जि. नागपूर यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती तात्काळ विनामुल्य देण्यात यावी किंवा उपलब्ध नसल्यास तसे कळविण्याचे पत्र तात्काळ आदेश प्राप्त होताच ७ दिवसात दयावे, असे आदेशीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दिनांक १५.०३.२०२१ रोजी " विहीत मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १६.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी पुरवठा रामटेक, जि. नागपूर श्री. स्वप्नील पडोठे उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय रामटेक, जि. नागपूर श्री. बाळासाहेब दादासाहेब मस्के उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या दि. २५.११.२०२० रोजीचा माहिती अर्जात, वडिल श्री. सुरेशराव पाटील यांच्या रेशन कार्डची माहिती मागितली आहे. त्यावर तत्कालिन जनमाहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी पुरवठा रामटेक यांनी दि. १०.१२.२०२० रोजी व दि. २४.१२.२०२० रोजी प्राप्त जोडपत्र-अ अनुषंगाने त्यांच्या शिधापत्रिकेची छायांकित प्रत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलार्थीस देण्यात यावी किंवा कसे याबाबत कलम ११ नुसार विचारणा केली असून त्यांच्या शिधापत्रिकेची छायांकित प्रत कार्यालयास उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली आहे. श्रीम.विभा बावनकर यांना दि. ०५.०१.२०२१ रोजी श्री. सुरेश पाटील यांच्याशी संबंधित वरील माहिती मागितली असल्यामुळे कुठलेही त्रयस्थ व्यक्तीची ही माहिती कलम ११ नुसार त्यांना विचारणा केल्याशिवाय प्रदान करणे माहिती अधिकार कायद्यात अपेक्षित नसल्याची बाब नमूद करून श्री. सुरेश पाटील यांनी जर परवानगी दिली तर माहिती तात्काळ प्रदान करण्यात येईल, असे सूचित करण्यात आले.

त्याविरुध्द अपिलार्थी यांनी दि. १८.०१.२०२१ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केले. त्यावर दि. ०८.०२.२०२१ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. तत्कालिन अपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी, रामटेक यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तात्काळ विनामूल्य प्रदान करण्यात यावी किंवा उपलब्ध नसल्यास तसे कळविल्याचे पत्र तात्काळ आदेश प्राप्त होताच सात दिवसात प्रदान करण्याचे आदेश निर्गमित केले. अपिलार्थी हे गुजरात येथे राहत असून सुनावणीस व्यक्तिशः हजर राहणे शक्य नसल्याने व्हिडीओ कॉन्फरन्सींगव्दारे वरील सुनावणी घेण्यात यावी असे सूचित केले.

**M. S.Kaushalya Devi vs The State (Govt.Of Nct Of Delhi)& on 19 October, 2022** व **मा. केंद्रीय माहिती आयोगाचे आदेश दिनांक** २५.०६.२०१४ वि. अन्न पुरवठा GNCCD

**AC/A/12/2013/AC** /Others **यात नमूद केल्याप्रमाणे शिधापत्रिकेच्या संबधीत माहिती ही वैयक्तिक स्वांतत्र जीविताशी संबंधित असल्यामुळे ४८ तासात पुरविण्याबाबत बंधनकारक असल्याचे सूचित केले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वरील आदेश प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी यांच्या वतीने विविध प्राधिकरणाकडे माहिती अर्जात व तक्रार अर्जात श्री. सुरेश पाटिल यांच्या शिधापत्रिका संबंधित असल्यामुळे तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी शिधापत्रिका हे संबंधित नागरिकाकडे उपलब्ध असून, मात्र त्यांच्या काही तपशिल डी १** मध्ये उपलब्ध असते. त्यात शोध घेतला असता, श्री. पाटील यांचे शिधापत्रिकेचा NPH योजनेचे कार्यालयीन डी १ मध्ये अनुक्रमांक ६५ शिधापत्रिकेबाबत नोंद असून ही शिधापत्रिका रद्द करण्यात आले असल्यास अपिलार्थी यांना दि. १०.०५.२०२१ रोजी सूचित केले. तसेच त्याच नोंदीविषयीच्या पृष्ठांची छायांकित प्रत अपिलार्थी यांना पुरविली. यात अनुक्रमांक ६५ वर श्री. पाटील यांचे शिधापत्रिका क्रमांकावर रद्द करण्यात आली असल्याची नोंद स्पष्टपणे आढळून येते.

मात्र अपिलार्थी यांनी व्दितीय अपिल अर्जात त्यांना जाणूनबुजून वरील माहिती नाकारण्यात आली असून त्यांच्या मालकी हक्क संदर्भात माहिती प्रस्तावित करणे शक्य असून जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्याबाबत व्दितीय अपिल अर्जात नमूद केले आहे. अपिलार्थी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना शिधापत्रिकेची छायांकित प्रत मिळणे अपेक्षित असून, आजपर्यंत वारवार माहिती अर्ज दाखल केल्यानंतरही याबाबतीत माहिती उघड करण्यास जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा विरोध हा अनाकरणीय असल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांच्या व्दितीय अपिल अर्जात अपिलार्थी यांनी जोडलेले श्री. सुरेश पाटील यांचा अर्ज क्र. ८८३९९५९ नोंदणी क्रमांक ८६९९४४ यात कौटुंबिक पुरवठापत्रिका/ शिधापत्रिकेची छायांकित प्रत संलग्न केली असून त्यात प्रौढ ६ व्यक्ती नमूद आहेत. त्यात पत्नी श्रीम. सुषमा पाटील, मुलगी विभा पाटील, मुलगा हर्षल पाटील,मुलगी राजश्री पाटील, आजी जनाबाई पाटील अशा व्यक्तीचा समावेश आहे.

आज झालेल्या सुनावणी दरम्यान, अपिलार्थी यांच्या विनंतीनुसार ते व्हिडीओ कॉन्फसिंगव्दारे वरील सुनावणी हजर झाले. श्रीम. विभा बावनकर व श्री. प्रकाश बावनकर यांनी जनमाहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती प्रदान केली नसल्याने व तसेच माहिती उपलब्ध असून त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे त्रयस्थ पक्षाची परवानगी घेण्यास कलम ११ (१) नुसार प्रश्नच कुठे येतो, अशी विचारणा केली. तसेच अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार दि. २४.०२.२०२१ रोजी श्री. पाटील यांची शिधापत्रिकेची छायांकित प्रत कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत दिशाभूल करणारी माहिती दिली असून, जरी वरील शिधापत्रिका कार्यालयात उपलब्ध नसल्याने त्यांनी गहाळ झाल्याबाबतची तक्रारीची प्रत प्रदान करण्यात यावे असे, प्रतिपादन केले आहे. सादर माहिती अर्जात त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी विविध टप्प्यावर दिलेला प्रतिसाद तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी विशेष कर्मचारी पाठवून श्री. सुरेश पाटील यांना विनंती केली असता, त्यावर श्री. सुरेश पाटील यांनी त्यांना माहिती देवू नये अशी ठाम आग्रही प्रतिपादन केले असून त्यांच्याकडे शिधापत्रिकेची कुठलेही माहिती देण्याचा नकार दर्शविला आहे.

अपिलार्थी यांना दि. २४.०२.२०२१ रोजी श्री. पाटील यांची शिधापत्रिका कार्यालयात उपलब्ध नसून जनमाहिती अधिकारी यांच्यावतीने कळविण्यात आले. त्यानंतर NPH योजनेचे कार्यालयीन डी १ मध्ये नोंद

अनुक्रमांक ६५ वरील शिधापत्रिका रद्द झाल्याची नोंद असून त्यांच्याशी संबंधित तपशिल कार्यालयात उपलब नाही. माहितीचा अधिकार कायद्यात कलम २ (च) मध्ये नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती प्रदान करणे अभिप्रेत आहे. माहिती अधिकार कायद्यात नविन माहिती निर्माण करणे, अपिलार्थी यांच्या प्रश्नांना उत्तर देणे, मोघम काल्पनिक Hypothetical माहितीला उत्तर देणे अपेक्षित नाही. सदर बाबी माहितीचा अधिकार कायद्याच्या व्याख्यात येत नाही. माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील दस्ताऐवज अभिलेख, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दापत्रक, परिपत्रके, आदेश, अहवाल नमुने, कागदपत्रे, कोणत्याही ईलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधार सामुग्री इत्यादीचा समावेश होते. तसेच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार एखाद्या विषयावर सल्ला मागणे, एखादी कार्यवाही पूर्ण करून माहिती देणे, एखाद्या कार्यवाही मागील खुलासा अथवा कारण देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादी कार्यवाहीची अपेक्षा करणे इत्यादीचा या व्याख्येमध्ये समावेश होत नाही.

या प्रकरणात अपिलार्थी यांची आग्रही विनंती असली तरी माहिती अधिकार अर्जानुषंगाने उपलब्ध असणारी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा पुरवठा याअधीच केला आहे. अपिलार्थी यांच्या आक्षेपासंबंधित वरील माहिती अर्जात त्यांना उघड करण्यास श्री. पाटील यांनी छायांकित प्रत प्रदान करण्याबाबत जनमाहिती अधिकारी यांना विरोध दर्शविला आहे. तसेच श्री. सुरेश पाटील यांची शिधापत्रिका NPH योजनेचे कार्यालयीन डी १ मध्ये अनुक्रमांक ६५ वर रद्द झाल्याची नोंद असून ही शिधापत्रिका रद्द करण्यात आली आहे. वरील माहिती अपिलार्थी यांना दि. १०.०५.२०२१ रोजी पुरविण्यात आल्याचे आढळून येते. यातील टिपणी उपलब्ध झालेल्या माहितीचा अर्ज दाखल केल्यानंतरही अर्जदार यांच्यावतीने करण्यात आलेला पाठपुरावा नंतर जनमाहिती अधिकारी यांनी केलेला पाठपुरावा वर उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना याआधीच पुरवठा करण्यात आला आहे. प्रथम अपिल आदेशाचे अनुपालन करून जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद माहिती अधिकार कायद्याशी सुसंगत आहे. जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २ (च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती प्रदान करण्याबाबत त्यांनी केलेले प्रयत्न हे प्रमाणिपणे असल्याचे आढळून येते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक :१६.०१.२०२३**

जावक क्रमांक 2962 दिनांक 15 MAY 2023

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते